पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मध्यवर्ती भांडार विभाग
क्र. मभा/३/कावि/१०५५/२०१७
दि.०८/१०/२०१७

प्रति,
सर्व विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

विषय – निविदा उघडणे रजिस्टरबाबत..
संदर्भ - परिपत्रक क. लेखा/१अ/६७५८/२०१७ दि. ४.८.२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या निविदा सध्या भांडार विभागामार्फत उघडल्या जातात. सद्यस्थितीत लेखा विभागाकडील परिपत्रक क्र. लेखा/१अ/६७५८/२०१७ दि. ४.८.२०१७ अन्वये परिच्छेद क्र. 5.1.4 प्रमाणे निविदा उघडणेचे कामकाज केले जाते. सदर समितीमध्ये भांडार विभागातील अधिकारी नसलेमुळे निविदा उघडणे रजिस्टरवर समितीच्या सह्या घेणे संबंधित विभागाला अडचणीचे होत आहे

सद्यस्थितीत परिच्छेद क. 5.1.4 प्रमाणे निविदा पडताळणी समीती कडूनच निविदा उघडणेचे काम केले जात असलेमुळे निविदा उघडणेचे कामकाजासाठी संबंधित विभागाने निविदा उघडणे कामी रजिस्टर ठेवणेत यावे व निविदा उघडताना संबंधित विभागाने सदर रजिस्टर घेऊन यावे व निविदा उघडण्यात याव्यात. तसेच निविदा उघडलेनंतर काढणेत येणारी भांडार विभागाची दुसरी प्रत काढणेत येऊ नये.

सहा.आयुक्त
मध्यवर्ती भांडार विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका